

# ड्रेस्डेनचे सुंदर सैंपर ओपरा हाऊस

पूर्व युरोपची सफर २

अनिकेत जोशी

पूर्वेकडे कम्युनिस्ट राजवटीत लोकांना दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत तर होतीच. पण पश्चिमेकडे असणाऱ्या नातलगांना मित्रांना भेटण्याची भेटीची आसही होती. कम्युनिस्ट राजवटीत आपल्या मुलाबाळांना भविष्य नाहीच या भीतीने गांगरलेले लोक काहीही करून पश्चिमेकडे पलायन करण्याच्या प्रयत्नात असत. काही लोकांनी तो एक व्यवसायच बनवून टाकला. मोटारीच्या डिकीत लपवून, सुटकेसमध्ये एखाद्याला कोंबून त्यांनी पूर्वेच्या लोकांना पश्चिमेला आणून सोडले. अशा दोन तीन मोटारी प्रदर्शनात आपल्याला दिसतात. पूर्वेकडे भिंतीला लागून असणाऱ्या एका घरातील एक महिला स्वतःला पश्चिमेकडे झोकून देते, पूर्वेकडचे पोलीस तिला वर खेचताहेत तर पश्चिमेकडचे लोक तिला खाली स्वातंत्र्याकडे ओढत आहेत अशी चित्र मालिका तर आढळते. एका कुटुंबाने बनवलेल्या, गरम हवेच्या मोठ्या फुग्याच्या आधारे थेट स्वातंत्र्य गाठले. त्या फुग्याच्या पाळण्यात बसून सारे सात आठ जणांचे कुटुंब मोठे दिव्य करून पश्चिमेकडे पोचले त्याची थरारक हकीकत तिथे मांडलेली दिसते. आज आपल्याला त्यात विशेष काय असे वाटेल. पण तिथे लिहिलेली हकीकत वाचताना त्यांचे भय, त्यांचा संघर्ष, त्यांची पळून जाण्याची ओढ जाणवते. गरम हवेचा फुगा तयार करणे हेही अशक्य काम त्या काळात होते. कारण त्यासाठी लागणारे, कापड, दोऱ्या आणि गॅस सिलेंडर मिळणे हेच कम्युनिस्ट राजवटीत मोठे दिव्य होते. अशा कोणत्याही वस्तू कोण व कशासाठी खरेदी करत आहे यावर पोलिसांची सक्त नजर असे. त्या कुटुंबाच्या सर्व सदस्यांनी वेगवेगळ्या भागातून थोड्या थोड्या प्रमाणात कापड, दोऱ्या आदि खरेदी केल्या. त्या एकत्र शिवून घरच्या घरीच फुगा तयार केला. चार घरगुती गॅस सिलेंडर जोडून जमवले व त्या आधारे त्यात गरम हवा भरली. गावाबाहेर दूर शेतात जाऊन तो फुगवला. त्यासाठी अंधाऱ्या असलेल्या रात्रीची वाट पहावी लागली. शिवाय वाऱ्याच्या वेगाचे अंदाज घेणे महत्त्वाचे होते. वारा पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाराच आहे की नाही याची खात्री करून घेतली. पण ते सारेच अंधारात तीर मारणे होते. धाडस असामान्यच म्हणा. ते सारे दिव्य करून त्या कुटुंबाने पश्चिम जर्मनीतील एका शेताला तो गरम हवेचा तो फुगा उतरवला व शिवाय दचकलेल्या शेतकऱ्याला विचारले की बाबारे ही पूर्व जर्मनी आहे की पश्चिम. जेव्हा अपेक्षित उत्तर आले तेव्हा त्यांनी आनंद साजरा केला.

हॅप्पी हॉलिडेच्या या प्रवासात आमचे जे सहकारी साथीदार होते तेही एकेक कलावंत होते. आपापल्या क्षेत्रात भरपूर काम केल्यानंतर, अनुभव घेतल्यानंतर जगाचे सारे कोपरे फिरून पहावेत अशी ऊर्मी असणाऱ्यांचा हा सारा प्रवासी गट होता. आणि त्यातही काहींना गाण्याची आवड व हौस होती. ते अंग होते. काहींना कथाकथनाची गोडी होती. काहींना जीवन अनुभव सांगायचे होते. अनेय जोशी हा आमचा प्रवास मित्र त्या सर्वांना संधी देत होता. तिसऱ्या दिवशी बर्लिनहून प्रागला जाताना बसमध्ये जो काही वेळ होता तो असा एकमेकांच्या भेटी ओळखी होण्यात, अंगचे काही कलागुण प्रकट होण्यात सत्कारणी लागला. आमच्या बारा जणांच्या ग्रुपमध्ये विजयी मामला भागात पहिलेच. आमच्या अन्य सहकाऱ्यांमध्ये पुण्याचे सुधीर करंदीकर होते. त्यांना लेखनाचे व कथाकथनाचे अंग आहे. आपल्या पैकी पुष्कळांनी 'दै. चित्रवाणी'च्या एका रविवारच्या अंकामध्ये आलेली महेश नावाची एक कथा नक्की वाचली असेल. समाजमाध्यमांतही ती पुष्कळ प्रचलित झाली होती. पुण्याच्या भयंकर ट्रॅफिकमधून वृद्धांना व गरजूंना रस्ता ओलांडण्याला मदत करणारी ती महेश करंदीकरांना सापडली होती व ती त्यांनी युरोपच्या त्या बसमध्ये पुन्हा एकदा ऐकवून मनमुराद आनंद दिला. त्यांनी आणखीही छान छान कथा सांगितल्या. एक निवृत्त बँक अधिकारी शेवडे होते. त्यांच्याकडे बँक कर्जाच्या वसुलीच्या व खेड्यांमधील मंडळींच्या हरसालपणाच्या अनेक चमत्कारिक अनुभवांची पोतडी होती. नीला घारपांनी गाणी म्हटली, तर विनोद घारपांनी एकच फँटसीसुद्धा पेश केले. सुहास नाडेंनी त्यांच्या आयआयटीच्या हॉस्टेलमधील गमती जमती सांगितल्या. त्यांना असे अनुभव मांडण्याची प्रेरणा मिळाली ती राहुल मसलेकरांकडून. मसलेकर हे हवाईदलाचे निवृत्त अधिकारी. त्यांनी एनडीएमध्ये विद्यार्थ्यांचे आयुष्य कसे असते ते तर सांगितलेच. पण युद्धस्य रम्या कथा त्यांच्याकडे असंख्य होत्या. मध्ये मध्ये मसलेकर त्यांची गाऱ्हाणी करीत. त्यांच्या पत्नी चित्रा यांची एक निराळी ओळख आम्हा सर्वांनाच अभिमानास्पद ठरली. वीर सावरकर हे त्यांचे आजोबा आहेत हे कळल्यावर सर्वांनाच एक सुखद धक्का बसला. त्यांनी सुरेल आवाजात सावरकरांची आणखी एखादी विशेष कानावर न पडणारी गीते सादर केली. एका हवाई दल अधिकाऱ्याची पत्नी या नात्याने त्यांना जो सैन्य जीवनाचा निराळा अनुभव आला तो त्यांनी मांडला. या सगळ्यामुळे पूर्व युरोपचा हा आमचा प्रवास निराळ्या अर्थाने नव्या ओळखी बरोबरच सर्वांनाच एक समृद्ध जीवनानुभव देणाराही ठरत होता.



बर्लिन नंतर पुढचा प्रवासाचा टप्पा होता ड्रेस्डेन सिटी. जर्मनीतील एक अत्यंत सुंदर असे गाव. शहर. तिथे एक जुना राजवाडा आहे. असे जुने कॅसल, पॅलेस, वैरे किल्ले, डोंगरावरचे किल्ले प्रत्येकच शहरात भेटत होते. प्रत्येक ठिकाणचे सौंदर्य निराळे, उपयोग निराळा. इतिहासही निराळा. पण सर्वत्र स्वच्छता, इतिहास जपण्याची, आठवणी साठवण्याची मानसिकता मात्र सारखीच तीव्र. प्रत्येक ठिकाणचे गाईड अत्यंत अभिमानाने तिथला वैशिष्ट्यपूर्ण इतिहास मांडत असत हे विशेष वाटले. एक खूप सुंदर ऑपेरा हाऊसही ड्रेस्डेनला आहे. (क्रमशः)